**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.०२ यांचा सरतपास**
देवाची शपथ खरे सांगतो

नाव -श्रावण महादेवराव हेडाऊ.
वय-५२ वर्षे, व्यवसाय-पेंटिंग,
रा. नेहरू नगर, नागपूर.

**<u>प्रतिवादीतर्फे सा.क्र.२ चा सरतपास शपथेवर प्रतिवादीचे वकील श्री जी.आर.हुंगे यांच्या मार्फत शपथेवर सुरू.</u>**

०१. मला न्यायालयाकडून साक्ष देण्याकामी साक्षसमन्स आला होता व त्यानुसार मी साक्ष देण्याकामी न्यायालयात आलो. मी प्रदिप वसंतराव तिवसे यांना ओळखतो. तसेच मी कमलाबाई वसंत तिवसे यांना ओळखतो. कमलाबाई वसंत तिवसे यांनी प्रदिप वसंतराव तिवसे यांना मृत्यूपत्र तयार करून दिले होते. सदर मृत्यूपत्रातील माहिती कमलाबाई हिने दिली होती. सदरची माहिती ही कमलाबाई हिने मला दिली होती. कमलाबाई आणि मी कोर्टामध्ये वकीलाकडे गेलो होतो. तसेच त्या ठिकाणी एक इसम आला होता त्याचे नाव मला आठवत नाही. त्यानंतर सदर मृत्यूपत्र प्रतिवादीची आई कमलाबाई हीच्या सांगण्यानुसार वकीलांनी तयार केले होते. त्यानंतर सदर मृत्यूपत्र वकीलसाहेबांनी वाचुन दाखविले होते. त्यानंतर कमलाबाई ठिक आहे असे म्हणाली. कमलाबाई हीने मृत्यूपत्रातील मजकूर बरोबर असल्याचे सांगितले. त्यावेळी त्या ठिकाणी मी, कमलाबाई व एक इसम ज्याचे नाव मला आठवत नाही असे हजर होतो. त्यानंतर कमलाबाई यांनी सदर मृत्यूपत्रावर सही केली व आंगठ्याची निशानी दिली. त्यानंतर मी सदर मृत्यूपत्रावर सही केली व माझ्या आंगठ्याची निशानी दिली. मला मृत्यूपत्र दाखविल्यास मी त्यावरिल सही ओळखू शकतो.

२. आता मला कमलाबाई वसंत तिवसे यांनी दि.२७/१०/२०२० रोजी करून दिलेले नोंदणिकृत मुळ मृत्यूपत्र दाखविण्यात आले. त्यावर माझी सही व आंगठ्याची निशानी आहे. तसेच त्यावर श्री सूर्यवंशी यांची सही व आंगठ्याची निशानी आहे. तसेच त्यावर कमलाबाई हीची सही व तिच्या आंगठ्याची निशानी आहे. आता मी सदर मृत्यूपत्रातील मजकूर वाचुन पाहिला असता त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे त्यास **नि. क्र.४०** देण्यात आला.

**<u>सरतपास पूर्ण.</u>**

**दोन्ही वादीसाठी वकील श्री. एल.आर. मांडवकर यांच्यामार्फत उलटतपास शपथेवर सुरू.**

३. मी कमलाबाई वसंत तिवसे हीला ७ ते ८ वर्षापासून ओळखतो. ती माझ्या नात्यातली नव्हती. कमलाबाई ही जुनी शुक्रवारी येथे राहत होती. जुनी शुक्रवारी व नेहरू नगर यामधील अंतर हे एक ते दिड किलोमीटर आहे. जुनी शुक्रवारी व नेहरू नगर, नागपूर हे घनदाट वस्तीचे ठिकाण आहे. मी कमलाबाई हिला ओळखतो कारण ती परमात्मा एक या मार्गामध्ये होती व मी पण सदर परमात्मा एक या मार्गामध्ये असल्याने आमची ओळख झाली होती. तसेच प्रतिवादी हासुध्दा परमात्मा एक सेवक होता. प्रतिवादीसोबत सदर परमात्मा एक कार्यक्रमातुन माझी ओळख झाली होती.

४. सदर मृत्यूपत्राच्या वेळी कमलाबाई हीचे वय ७० वर्षांच्या वर होते. हे म्हणणे खरे नाही की, कमलाबाई ह्या त्यावेळी आजारी होत्या. हे मला माहित नाही की, कमलाबाई हिला पंधरा वर्षापुर्वी अर्ध्यांगवायूचा झटका आला व तिचा डावा भाग हा लुळा पडला होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, कमलाबाई हीला चालता व बोलता येत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, कमलाबाई हीची मानसिक स्थिती बरोबर नव्हती.

५. हे मला माहित नाही की, प्रदिप हा दारू पित होता किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की, प्रदिप याला दारूचे व्यसन आहे. मला दारू पिण्याचे व्यसन नाही. प्रतिवादी दिपक हादेखिल पेंटिंगचे काम करतो. हे म्हणणे खरे नाही की, मी व प्रतिवादी पेंटिंगचे एकत्र काम करतो. मी १५ ते २० वर्षांपासुन पेंटिंगचे काम करतो.

६. सदर मृत्यूपत्र हे कोर्टामध्ये वकीलांनी लिहीले होते. मृत्यूपत्र करण्याच्या दिवशी कमलाबाई ह्या माझ्या घरी आल्या होत्या. त्यावेळी प्रदिप हा घरी नव्हता. सदर मृत्यूपत्र करतेवेळी कागदपत्रे कमलाबाई यांनी आणले होते. कमलाबाई यांनी सदर कागदपत्रे कोठून आणले याबाबत मला माहिती नाही. मी व कमलाबाई सदर मृत्यूपत्र करण्यासाठी ॲटोने गेलो होतो. त्यावेळी आम्ही कोर्टामध्ये वकीलांकडे गेलो होतो. कोणत्या वकीलांकडे गेलो होतो त्यांचे नाव मला आठवत नाही. कमलाबाई यांनी कोणते कोणते कागद सोबत आणले होते त्याबाबत मला कल्पना नाही. कमलाबाई यांनी कोणते कागदपत्र वकीलांकडे दिले त्याबाबत मला माहिती नाही. वकीलांनी सदर मृत्यूपत्र हे १०० रूपयाच्या स्टँपवर लिहून दिले होते, तो स्टँप कमलाबाई यांनी खरेदी केला होता. हे मला माहित नाही की, सदरचा स्टँप पेपर हा त्याच दिवशी खरेदी केला होता की, कधी खरेदी केला होता. कमलाबाई यांनी सांगितलेला मजकूर वकीलांनी हातांनी लिहीला की, मशीनवर लिहीला हे

मला सांगता येत नाही. मी सदर मजकूर वाचून पाहिला नव्हता. कमलाबाई यांनी मजकूर वाचला नव्हता, परंतु सदर मृत्यूपत्रातील मजकूर कमलाबाई यांना वकीलांनी वाचुन दाखविला होता. मी सदर १०० रूपयाच्या स्टँपवर सह्या केल्या होत्या. कमलाबाई यांनीसुध्दा सदर स्टँपवर सही केली होती. दुसरा साक्षीदार सूर्यवंशी असा कोणीतरी होता, त्याचे नाव मला निश्चित आठवत नाही, तसेच तो कोठला होता हे मला सांगता येत नाही. कमलाबाई हीला तो साक्षीदार ओळखत असेल. मी सदर मृत्यूपत्रावर सह्या वकीलांपाशी तेथे केल्या होत्या व त्यानंतर आम्हाला ऑफिसमध्ये नेण्यात आले. आम्हाला रजिस्ट्री ऑफिसमध्ये नेले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी सांगतो त्याप्रमाणे कमलाबाई यांनी मृत्यूपत्र तयार करून दिलेले नाही.

**प्रश्न**–वरिल सदर १०० रूपयाचा स्टँपवर लिहीलेले मृत्यूपत्र हेच तुम्ही रजिस्ट्रार ऑफिसला नेले होते काय?

**उत्तर**–होय.

वकीसाहेबांनी तेथेच प्रिंट काढली होती. परंतु, सदर प्रिंट कोठून आणली हे मला माहिती नाही. प्रिंट काढायला वकीलसाहेब कोठे गेले होते व किती अंतरावर गेले होते हे मला सांगता येत नाही. वकीलसाहेब प्रिंट काढायला एकटेच गेले होते. कशासंबंधी मृत्यूपत्र होते त्याबात तेवढे मला माहिती नाही.

७. कमलाबाई यांना दोन मुली आहेत किंवा कसे हे त्यावेळी मला माहिती नव्हते. मुलींना काय द्यायचे याबाबत कमलाबाई यांनी मला सांगितले नव्हते. कमलाबाईचे त्यांच्या मुलींसोबत कसे संबंध होते ते मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, कमलाबाई यांनी सदर मृत्यूपत्र करून दिलेलेच नाही. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी प्रदिप हा माझा मित्र असल्यामुळे त्याच्या सांगण्यावरून मी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मृत्यूपत्र करतेवेळी प्रतिवादी प्रदिप हा तेथे हजर होता. हे म्हणणे खरे नाही की, प्रतिवादी प्रदिप याच्यासोबत संगणमत करून सदर मृत्यूपत्राचा दस्तऐवज तयार करण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, सदर मृत्यूपत्राबाबत कमलाबाई यांना मुळीच कल्पना देण्यात आली नव्हती. साक्षीदार स्वत:हून सांगतो की, कमलाबाई यांनी मला मृत्यूपत्राबाबत सांगितले होते. मी मृत्यूपत्रावर एक वेळेस वकीलसाहेब यांच्या ऑफिसमध्ये सही केली होती व दुस–यांदा रजिस्ट्रार यांच्या कार्यालयात सही केली होती. हे मला माहित नाही की, सदर मृत्यूपत्र करून देणारे वकील हे प्रतिवादी प्रदिप यांच्या ओळखीचे होते किंवा कसे. हे म्हणणे खरे नाही की,

प्रतिवादी हा माझा मित्र असल्यामुळे त्यांच्या सांगण्यावरून मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण.**

**फेरतपास काही नाही.**

वा.दा.ब.अ.सा.

समक्ष

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड
दि २०/०१/२०२६

(आर.एस.मानकर)
२ रे सह.दि. न्या.,क.स्तर,उमरेड